(CNR No. MHAM120003982025)

याचिका दाखल दिनांक : १०.०२.२०२५
याचिका नोंदणी दिनांक: १०.०२.२०२५
न्यायनिर्णय घोषित दिनांक :१४.०८.२०२६
**कालावधी:०१ वर्षे: ०६ महिने: ०४ दिवस**

**दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, दर्यापूर यांचे न्यायालय**
**(पीठासीन अधिकारी श्री. महेश ए. शिलार यांचे समक्ष)**

**हिंदू विवाह याचिका क्रमांक : ३२/२०२५** **निशाणी क्रमांक : २१**

**प्रियंका अमीत कांबळे**
वय : ३१ वर्षे, धंदा : घरकाम,
द्वारा. दादाराव गोविंदराव अभ्यंकर,
रा.पो. विहीगाव,
ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती. **.... याचिकाकर्ता**

**//विरुद्ध//**

**अमीत प्रदिप कांबळे**,
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी,
रा. मैत्री बुध्द विहाराजवळ, गल्ली नं. १,
नवीन बाबुलखेडा, नागपुर,
ता. जि. नागपुर **.... उत्तरवादी**

**हिंदू विवाह कायद्याचे कलम ९ प्रमाणे**

---

**याचिकाकर्ता तर्फे विद्वान विधिज्ञ : कु. आर. आर. ठाकुर**
**उत्तरवादी विरुध्द प्रकरण विना लेखी जबाब**

---

**(न्यायनिर्णय)**
**(घोषीत दिनांक १४/०८/२०२६)**

प्रस्तुतची याचिका याचिकाकर्तांने हिंदु विवाह कायद्याचे कलम ९ अन्वये विवाह पुन:स्थापनेकरीता दाखल केली आहे.

**याचिकेतील कथन थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.**

२. याचिकाकर्ता व उत्तरवादी हे पती-पत्नी असून त्यांचा विवाह दि. २३/०५/२०२२ ला विहीगाव येथे झाला. विवाहानंतर याचिकाकर्ता ही उत्तरवादीकडे नांदण्यास गेली. विवाहपश्चात केवळ दोन महिने उत्तरवादीने याचिकाकर्ता हीला चांगली वागणुक दिली. त्यानंतर लग्नात कमी हुंडा मिळाला या कारणावरुन उत्तरवादी याने याचिकाकर्ता हीला मानसिक व शारीरीक तसेच आर्थिक त्रास दिला. उत्तरवादीचे बहीण व जावई हे वारंवार येवुन याचिकाकर्ता हीला अश्लिल शिवीगाळ तसेच मारहाण करत होते. तसेच तिच्याकडे तिच्या वडीलांकडुन दोन लाख रुपये घेवुन येण्याचा तगादा लावत होते. उत्तरवादीचे वडील, आई व लहान भाउ देखील याचिकाकर्ता हीला त्रास देत होते. तसेच त्यांच्या चिथावणीवरुन उत्तरवादी हा याचिकाकर्ता हीला मारहाण करत होता. याचिकाकर्ता हीला विवाहानंतर पाच महिन्यांच्या आतच उत्तरवादी याने तिला घराबाहेर हाकलुन दिले. त्यामुळे याचिकाकर्ता हीला नाईलाजास्तव माहेरी राहावे लागत आहे.

३. याचिकाकर्ता पुढे असे कथन करते की, तिचे आई वडीलांनी व इतर नातेवाईकांनी दिलेले सर्व सोन्याचांदीचे दागदागिने उत्तरवादीकडेच आहे. तसेच त्याने तिला घराबाहेर हाकलुन देत असताना तिच्या अंगावरील देखील सर्व दागदागिने काढुन घेतले. तसेच लग्नातील आंदण व इतर भेटवस्तु देखील उत्तरवादी याचेकडेच आहेत. उत्तरवादी व त्याचे नातेवाईक याचिकाकर्ता हीला शारिरीक व मानसीक त्रास देत असत. तसेच त्यांच्या चिथावणीवरुन उत्तरवादी हा तिला मारहाण करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करत होता.

४. उत्तरवादीने याचिकाकर्ता हीला घराबाहेर हाकलुन दिले व तेव्हापासुन त्याने तिच्यासोबत कुठलाही संपर्क न ठेवल्यामुळे, एक वर्ष वाट पाहुन याचिकाकर्ता हीने अजंनगाव सुर्जी न्यायालयात कौटुंबिक हिंसाचार अतंर्गत प्रकरण दाखल केले होते व त्या प्रकरण निकाली निघाले. तरीही याचिकाकर्ता ही उत्तरवादीची कायदेशीर पत्नी असुन

तिला गैरअर्जदारासोबत राहण्याचा पुर्ण अधिकार असुन देखील उत्तरवादीने तिला वंचित ठेवुन तिच्यावर अन्याय केला आहे. याचिकाकर्ता ही स्वत:च्या भविष्याचा विचार करता, उत्तरवादीसोबत संसार करण्यास तयार आहे. त्यामुळे याचिकाकर्ता हीने विवाह पुन:स्थापनेकरीता सदरची याचिका दाखल केली.

५. उत्तरवादी यास सदर प्रकरणाचे सुचनापत्राची बजावणी झाल्यानंतर तो हजर झाला, परंतु त्याने लेखी म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द सदर प्रकरण विना लेखी जबाब पुढे चालविण्यात आले.

६. याचिकाकर्ताच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

७. याचिकाकर्त्याची कथने व पुरावा विचारात घेता, माझ्यासमोर खालील नमूद मुद्दे उपस्थित होत असुन त्याबाबत कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | उत्तरवादीने याचिकाकर्ता हीला मानसिक व शारीरिक त्रास देवुन तिला क्रुरतेची वागणुक दिली, हे याचिकाकर्ता सिध्द करते काय? | होय. |
| २. | उत्तरवादीने कोणतेही वाजवी कारण नसतांना याचिकाकर्ताचा त्याग केला, हे याचिकाकर्ता सिध्द करते काय? | होय. |
| ३. | याचिकाकर्ता ही विवाह पुन:स्थापीत होऊन मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| ४. | आदेश व आज्ञप्ती काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ करीता -**

८. वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने, कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांना एकत्रीत चर्चेकरीता घेण्यात येत आहे. सदर याचिकेतील कथनांच्या समर्थनात याचिकाकर्तीने नि.क्र. १८ वर शपथेवर साक्ष दिली आहे. प्रकरणाच्या पुष्ठयर्थ विवाह पत्रिका, लग्नाचा फोटो व आधार कार्ड, इत्यादी दस्तावेज दाखल केले आहेत.

९. याचिकाकर्तीने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात याचिकेतील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तसेच उत्तरवादीने व त्याच्या नातेवाईकांनी तिच्यासोबत केलेल्या क्रुरतेबाबत कथन केले आहे. तिने असेही सांगितले की, लग्नात कमी हुंडा मिळाला या कारणावरुन उत्तरवादी तिचा मानसिक, शारीरीक व आर्थिक छळ करत होता. तसेच उत्तरवादीचे वडील, आई व लहान भाउ तिला उत्तरवादीसोबत जेवण करण्यास देखील मनाई करत होते. उत्तरवादीची बहीण व जावई हे त्यांच्याकडे वांरवार येवुन याचिकाकर्ता हीला अश्लिल शिवीगाळ करुन तिचा मानसीक छळ करत असत. तिला उत्तरवादीने विवाहपश्चात पाच महीन्याच्या आतच घराबाहेर हाकलुन दिले होते व तिच्या अंगावरील सर्व दागदागिने काढुन घेतले होते. तेव्हापासुन याचिकाकर्ता ही माहेरी राहत आहे. उत्तरवादीने त्यादरम्यान तिची कुठलीही विचारपुस केली नाही व तिच्याशी संपर्क ठेवला नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणात उत्तरवादीने त्याचे म्हणणे दाखल करुन याचिकाकर्ता हीच्या कथनाला आव्हानीत केले नाही. त्यामुळे याचिकाकर्ताचा मौखिक पुरावा विनाखंडण राहीला. एकंदरीत याचिकाकर्ताच्या खंडणविरहीत सरतपासावरुन हे स्पष्ट होते की, उभयंतांचा दि. २३/०५/२०२२ रोजी विवाह संपन्न झाल्यानंतर याचिकाकर्ता ही उत्तरवादीकडे नांदायला आली. परंतु, तिला उत्तरवादी व त्याच्या नातेवाईकांनी चांगली वागणुक दिली नाही. याचिकाकर्ता हीच्या पुराव्यावरुन असेही दिसते की, उत्तरवादी हा नेहमी हुंडा कमी दिला या कारणावरुन तिला मारहाण करत होता व त्याची बहीण व जावई देखील तिच्याकडे वडीलांकडुन पैसे मागण्यासाठी तगादा लावत होते. याचिकाकर्ताच्या

पुराव्यावरुन पुढे असे स्पष्ट होते की, उत्तरवादीने तिच्या अंगावरील सर्व सोन्याचांदीचे दागदागिने काढुन तिला घराबाहेर हाकलुन दिले व त्यामुळे तिला माहेरी राहायला जावे लागले. तेव्हापासुन उत्तरवादी याने तिच्याशी कोणताही संपर्क ठेवला नाही किंवा तिची विचारणा देखील केली नाही.

११. याचिकाकर्ता हीने उत्तरवादीसोबतचा विवाह पुन:स्थापीत होवून मिळण्यासाठी दिलेले कारणे व उत्तरवादीविरुध्द केलेल्या आरोपांचे खंडण करणे उत्तरवादीकडुन अपेक्षीत होते. परंतु, उत्तरवादीला याचिकेची माहिती असुनदेखील त्याने त्याचे सविस्तर म्हणणे दाखल करुन याचिकाकर्ता हीच्या कथनाचे खंडण केले नाही. त्यामुळे याचिकाकर्तीच्या याचिकेतील व पुराव्यातील उत्तरवादीने तिला दिलेल्या क्रुर वागणुकीबाबतचे तसेच तिला घराबाहेर हाकलुन दिल्यामुळ नाईलाजास्तव तिला माहेरी निघुन जावे लागल्याबाबतचे कथने अविवादीत राहुन विश्वासार्ह वाटते. तसेच याचिकाकर्ता हीची उत्तरवादीसोबत नांदण्याची इच्छा असुन देखील उत्तरवादीने तिच्याशी संपर्क ठेवला नाही, असे दिसुन येते. त्यामुळे कोणतेही वाजवी कारण नसतांना उत्तरवादीने याचिकाकर्ता हीचा त्याग केल्याचे देखील स्पष्ट होते. एकंदरीत याचिकाकर्ताचा अखंडीत पुरावा व दस्तावेजावरुन उत्तरवादीने याचिकाकर्ता हीला शारीरिक व मानसिक त्रास देउन तिला क्रुरतेची वागणुक दिल्याचे तसेच कोणत्याही संयुक्तीक कारणांशिवाय तिचा त्याग केल्याचे, याचिकाकर्ता हीने सिध्द केले आहे.

१२. याचिकाकर्तीने उत्तरवादीसोबत एकत्र नांदण्यासाठी केलेल्या प्रयत्नावरुन ती पुर्वीही संसार करण्यास इच्छुक होती तसेच सदर प्रकरण दाखल करुन ती आजही उत्तरवादीसोबत संसार करण्यास तयार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे याचिकाकर्ता हीची उत्तरवादीसोबत नांदण्याची ईच्छा तसेच तिच्या भवितव्याचा विचार करता, प्रस्तुत याचिका मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब, याचिकाकर्ता ही उत्तरवादीसोबतचा विवाह पुन:स्थापीत होउन मिळण्यास पात्र आहे. वरील चर्चेअंती मुद्दा क्र. १ ते ३ चे होकारार्थी उत्तर देत असुन मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. याचिकाकर्ताची प्रस्तुत याचिका मंजूर करण्यात येते.

२. उत्तरवादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने सदर आदेश दिनांकापासुन एक महिन्याच्या आत याचिकाकर्ता हीला नांदण्याकरीता घेवुन जावे.

३. याचिकाकर्ताने सदर आदेशाबाबत उत्तरवादीला अवगत करावे.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आदेशित, उद्घोषित व संगणक मुद्रित करण्यात आला.)

**(महेश ए. शिलार)**
दिवाणी न्यायाधिश, (वरिष्ठ स्तर),
दर्यापूर

दिनांक : १४.०८.२०२६